:: ::

**फौ. कि. अर्ज क्र. १२/२०२१**
रुपाली ..वि. अमित गरगडे
निशाणी क्र.– ३६ लगत

**अर्जदार तर्फे साक्षीदार क्र.२ यांची जबानी**

मी शपथेवर सांगते की,

माझे नांव– कल्याण बिभिषण घोगरे
वय–४५ वर्षे, धंदा – मजुरी
रा. निरनिमगांव, ता. इंदापूर, जि. पुणे.

**पुढील सरतपासणी अर्जदार तर्फे विधीज्ञ श्री. पी. के. कडाळे यांच्या मार्फत**

**१.** माझ्या पुराव्याचे शपथपत्र **निशाणी क्र.३६** मधील सर्व मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिण्यात आलेला असून तो खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. ती सही मी ओळखतो.

**उलटतपास जाबदेणार तर्फे विधीज्ञ श्री. जी. एम. पाटील यांच्या मार्फत**

**२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२/०५/२०१९ रोजी अर्जदाराच्या लग्नास मी हजर नव्हतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या बहिणीचे शिक्षण एम.एसी. ॲग्री पर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही श्रीराम शिक्षण संस्था पानीव, ता. माळशिरस, जि. सोलापूर येथे लग्नाच्या पूर्वीपासून शिक्षीका म्हणून कार्यरत आहेत व अर्जदारास सदर नोकरीतून दरमहा रक्कम रु.८५,०००/– मिळते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदाराने अकलुज येथे सदर नोकरीसाठी फ्लॅट भाड्याने घेतला होता. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार यांचे बोरी गाव असून तेथे कामानिमित्त अर्जदारसोबत जाबदेणार हा कामानिमित्त जात होता.

**३.** हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार याने माझ्या बहिणीकडे माहेरुन रक्कम रु.५,००,०००/– घेवून ये अशी मागणी केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुराव्याच्या शपथपत्रातील परिच्छेद क्र.२ मधील मजकुर की, दिनांक १७/०६/२०१९ रोजीच्या घटनेबाबत चुकीचे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर घटनेबाबत अर्जदार

::     ::

हिने वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अशी कोणतीही घटना घडली नसल्यामुळे माझ्या बहिणीने वालचंदनगर येथील पोलीस स्टेशनला तक्रार दिली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, अर्जदारास संसार करण्याचे असल्याने तिने तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, जाबदेणार हा अनेकवेळा अर्जदारास नांदविण्याचा प्रयत्न असता अर्जदार ही नांदण्यास गेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३०/०९/२०१९ रोजी कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनेबाबत मी अथवा अर्जदाराने पोलीस स्टेशनला तक्रार दिली नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, बहिण ही नांदवी या अपेक्षेने तक्रार दिली नाही.

**४.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२/०८/२०२० रोजी जाबदेणार याने दुसरा विवाह केलेला असून त्यातून त्यास एक मुलगी झाली आहे, ही बाब माझ्या पुराव्याच्या शपथपत्रात खोटी नमूद केली आहे. हे मला माहित नाही की, आज रोजी जाबदेणार याच्या नावावर शेती, द्राक्षेच्या बागा तसेच बंगले आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही नोकरी करीत असल्यामुळे तिची आर्थीक परिस्थीती चांगली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे अर्जदारास कोणतीही पोटगीची आवश्यकता नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही माझी बहिण असल्यामुळे मी तिच्या बाजुने खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI
Date: 2026.03.25 17:57:02 +0530

न्यायदंडाधीकारी प्र.श्रे.इंदापूर

दिनांक – २५/०३/२०२६

समक्ष,

Digitally signed by MUJAHEDUL HAQUE HAFEEZUL HAQUE FAROOQUI
Date: 2026.03.25 17:57:07 +0530

(एम.एच. फारुकी)

न्यायदंडाधीकारी प्र.श्रे.इंदापूर